■ वर्ष-०६ ■ अंक-४९ ■ मुंबई, मंगळवार २७ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर-२०२० ■ पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक ● सह संपादक : सौ. डॉ. अश्विनी नाईक

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page



PG 2 पोलीसांच्या चुकीच्या कार्यपध्दती मुळे गरिबांच्या हक्काचा रेशन मालाचा काळा बाजार करणारे माफिया अजूनही मोकाट

3 → एका वृत्त वाहिनीमुळे कायद्याची ऐसी के तैसी

प्रतिबंधित पानमसाला असलेल्या गोदामावर अन्नव औषध प्रशासनाच्या ... ← 4


## 'हिम्मत असेल तर सरकार पाडून दाखवा'

**मुंबई : 'तारीख पे तारीख देतायत, देवू देत. अनेकजण स्वप्नं पाहयातय सरकारचे पाडण्याचे पण आताही आवाहन करतो, 'जर हिंमत असेल तर सरकार पाडा'.आम्ही सत्तेला डसणारे मुंगळे नाहीत,' असं म्हणतं शिवसेना पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दसरा मेळाव्यातील भाषणाला सुरूवात केली.**




### उद्धव ठाकरेंच्या दसरा मेळाव्यातील भाषणाचे महत्वाचे मुद्दे

- महाराष्ट्र ही वाघाची औलाद आहे, आडवं आल्यावर काय होते. याचा इतिहास आहे व भविष्यातही समजेल
- काही जणांना गुरेढो-याची लसं द्यावी लागतात
- बेडूक आणि दोन पिलं सद्या इकडून तिकडं उड्या मारतात
- मुख्यमंत्री आणि पक्षप्रमुख म्हणून संयमानं बोलण्याचा प्रयत्न करतो.
- खोटे आरोप, आळ घेतले जातायत. पण आम्ही शांत राहिलो
- टक्कर देण्याची खूमखूमी असेल त्यांनी प्रयत्न करावा
- मंदिरे उघडत नाही म्हणून हिंदुत्वाबद्दल विचारतायत. जेव्हा बाबरी पाडली तेव्हा शेपट्या घालून बिळ्या बसली होती
- देवळात घंटा बडवणारा नव्हे तर अतिरेक्यांना बडवणारा हिंदूत्व हवा
- कोरोना घालवण्यासाठी थाळ्या बडवायला सांगणारे हिंदुत्व का
- गोव्यात गोहत्या बंदी का नाही ?
- जेवढं लक्ष पक्षावर देताय, तेवढं लक्ष देशावर द्या
- आपल्या हक्काचे ३८ हजार कोटी केंद्राकडं बाकी आहे, ते देतच नाहीयत.
- जीएसटी पद्धत फसली आहे. पीएमनी चूक मान्य करून जीएसटी रद्द करून जुन्या करप्रणालीकडं जायला हवं
- इंग्रजांसारखी मस्ती भाजपकडे
- शिवसेनेसोबतही डाव खेळला गेला होता.
-मोहन भागवतांना राष्ट्रपती करण्याची मागणी आम्ही केली होती
- संघमुक्त भारत म्हणणारे नितीश कुमार कसं चालतात ?
- कोरोनाची लस बिहारमध्ये फुकट

...पान २ वर...

## आयडॉलची बीए व बीकॉमची परीक्षा विनाअडथळा पूर्ण



तांत्रिक अडचणीमुळे पुढे ढकललेल्या मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या तृतीय वर्ष बीए व बीकॉमची परीक्षा सोमवारी ...पान २ वर...

## सावधान ऑनलाइन समान मागावताना तुमची फसवणूक होऊ शकते



सणांच्या ऑनलाईन विक्रीत एका तरुणाने चांगली ऑफर पाहिल्यानंतर मोबाईल बुक केला. चार दिवसांनंतर त्या तरुणाच्या घरी डिलिव्हरी मॅननेही ...पान २ वर...

## कोरोना चाचणीसाठी आता 980 रुपये दर निश्चित - आरोग्यमंत्री



मुंबई : राज्यात खासगी प्रयोगशाळेत होणाऱ्या कोरोना चाचण्यांसाठीचे दर पुन्हा एकदा सुधारीत करण्यात आले असून प्रति तपासणी सुमारे 200 रुपये कमी करण्यात आले आहे. त्यामुळे आता नव्याने निश्चित केलेल्या दरानुसार चाचण्यांसाठी 980, 1400 आणि 1800 रुपये असा कमाल दर आकारण्यास खासगी प्रयोगशाळांना बंधनकारक करण्यात आले आहे. यापेक्षा अधिक दर खासगी प्रयोगशाळांना आकारता येणार नाही. 4500 रुपयांवरुन 980 रुपयांपर्यंत इतके कमी दर निश्चित करुन सामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी आज सांगितले.

कोरोना चाचण्यांचे दर निश्चित करताना तीन टप्पे करण्यात आले असून प्रयोगशाळेत तपासणी केल्यावर 980 रुपये दर आकारण्यात येईल. कोविड सेंटर, रुग्णालये, क्वारंटाईन सेंटरमधील प्रयोगशाळा येथून सॅम्पल गोळा करुन तपासणी करण्यासाठी 1400 रुपये तर रुग्णाच्या घरी जाऊन सॅम्पल घेऊन तपासणी करण्यासाठी 1800 रुपये असा कमाल दर आता निश्चित करण्यात आला आहे. सामान्य माणूस केंद्र स्थानी ठेवून राज्य शासनाने सातत्याने दरामध्ये घट आणत रुग्णांना दिलासा देण्याचा प्रयत्न केल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यात कोरोना नियंत्रणासाठी चाचण्यांवर भर देण्यात असून प्रती दहा लाख लोकसंख्येमागे 70 हजार चाचण्या केल्या जात असून त्या वाढविण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. जेणेकरुन कोरोनावर अधिक नियंत्रण मिळविता येईल. राज्यभरात सुधारित दरानुसार रुग्णांकडून पैसे आकारले जावेत यासाठी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्तांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी केले.

## कोरोनासोबत च्या युद्धात मुंबई मारतेय बाजी, पण....






मुंबई : मागील काही महिन्यांपासून सातत्यानं फोफावणारा coronavirus कोरोना व्हायरस आता मात्र कमी तीव्रतेच्या टप्प्यात जात असल्याचं निरिक्षणातून पाहायला मिळत आहे. मुळात याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही, पण कोरोना रुग्णांच्या नव्या आकडेवारीचा अहवाल पाहता काही महत्त्वाच्या गोष्टी स्पष्ट होत आहेत. त्यातच मायानगरी ...पान २ वर...

## वर्दीवर हल्ला! वाहतुकीवरुन झालेल्या वादात सेवानिवृत्त महिला पोलीस निरीक्षकाने घेतला महिला पोलीस उपनिरीक्षकाचा चावा



राज्यातील पोलीस सुरक्षित आहेत का असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. पोलिसाच्या डोक्यावर तलवारीने वार केल्याची घटना ताजी असताना पंढरपुरात निवृत्त महिला अधिकाऱ्यानं महिला फौजदाराचा चावा घेतल्याची घटना घडली आहे.पंढरपूर : कोरोना संकटात कोरोना योद्धा म्हणून भूमिका बजावणारे राज्यातील पोलीस सुरक्षित आहेत का असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. मुंबईत एका वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याला महिलेने मारहाण केली. तर अंबरनाथमध्ये टोळक्याने एका पोलिसाच्या डोक्यावर तलवारीने वार केल्याची घटना ताजी असताना पंढरपुरात निवृत्त महिला अधिकाऱ्यानं महिला फौजदाराचा चावा घेतल्याची घटना घडली आहे. त्यामुळे वर्दीवर हात उचलणाऱ्याचं काय करायचं हा प्रश्न विचारला जात आहे.पंढरपूर पोलीस उपविभागीय कार्यालयासमोरील रस्त्यावर दोन ...पान २ वर...

## सरकार पाच वर्ष चालेल हा मुख्यमंत्र्यांचा आत्मविश्वास-थोरात



मुंबई : 'सरकार पाडून दाखवा असं आव्हान मुख्यमंत्र्यांनी भाजपला दिलंय तो मुख्यमंत्र्यांचा आत्मविश्वास आहे. महाविकास आघाडी सरकार पाच वर्ष चालेल हा मुख्यमंत्र्यांचा आत्मविश्वास आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी काँग्रेस सत्याग्रह करणार आहे. 31 ऑक्टोबर रोजी राज्यभर शेतकरी आणि कामगारांच्या हक्कासाठी काँग्रेस प्रत्येक जिल्ह्यात सत्याग्रह केलं जाणार आहे.' अशी माहिती बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे.

प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात, महाराष्ट्र प्रभारी एच के पाटील, अशोक चव्हाण, नितीन राऊत, यशोमती ठाकूर, विजय वड्डेट्टीवार, सुनील केदार हे सगळे वर्धा येथील सेवाग्राम आश्रमात सत्याग्रह करणार आहेत.

यावेळी सकाळी अकरा ते दुपारी चार पर्यंत काँग्रेस नेते आणि मंत्री उपस्थित असणार आहेत.

'कोणीही किती प्रयत्न आणि कारस्थान केली तरी महाराष्ट्राचे ठाकरे सरकार पाच वर्षे पूर्ण करेल. तारखा कितीही दिल्या तरी सरकारच्या केसालाही धक्का लागणार नाही.' असं खासदार संजय राऊत यांनी म्हटलं होतं.

## अनधिकृत बांधकामावर मीरा भाईंदर पालिकेची तोडक कारवाई









मिरा भाईंदर महानगर पालिका प्रभाग समिती क्र. ४ अंतर्गत आरक्षण क्र. २५९,२९८,२९९ या ठिकाणी अनधिकृत बांधकामावर आज दि २३/१०/२०२० रोजी प्रत्यक्ष जागेवर उपस्थित राहुन सदरचे बांधकाम मा. उप-आयुक्त(अतिक्रमण) श्री. अजित मुंठे सो.,यांच्या नियंत्रणाखाली मा. विभाग प्रमुख (अतिक्रमण) श्री नरेंद्र चव्हाण ,प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४, श्री. हंसराज मेश्राम, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २, श्री . चंद्रकांत भोरसे,प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ५,श्री. सुदाम गोडसे तसेच कनिष्ठ अभियंता प्रभाग समिती क्र. ६,श्री संदीप साळवे व प्रभाग समिती क्र . ४ चे कनिष्ठ अभियंता यांच्या मार्फत सैनिक सिक्युरीटी व पोलीस बंदोबस्तामध्ये J C B च्या साहाय्याने सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन तोडक कारवाई करण्यात आलेली आहे.

## सरकारी अन्न धान्याचा काळा बाजार करणाऱ्या टोळीची धरपकड न झाल्यामुळें पोलिसांना माहिती देणाऱ्या इसमावर प्राणघातक हल्ला



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रेशनच्या धान्याचा काळाबाजार करणाऱ्या माफियांचा पर्दाफाश करणारे अनिल अग्रवाल यांच्यावर बोरिवली ते मालाड येथील महामार्ग परिसरात टाइम्स ऑफ इंडिया विजे जवळ एका टॅक्सी चालकाने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला.दिनांक २३/१०/२०२० रोजी सुमारे ३:१५ च्या दरम्यान अनिल अग्रवाल आणि त्यांचे दोन अंगरक्षक नावे, श्री. धुरना डिहिंग्या आणि श्री.अशोक मिश्रा यांच्यासह अनिल अग्रवाल यांचा मुलगा अनुराग हे चौघे त्यांच्या इनोवा कार मधून निघाले होते.पश्चिम द्रुतगती मार्ग बोरिवली कडून मालाड कडे जाणाऱ्या महामार्गावरील टाइम्स ऑफ इंडिया विजेचे इथे पोहोचताच. त्यांच्या गाडी मागे असलेल्या एका टॅक्सी चालकाने जोरा जोरात हॉर्न वाजवण्यास सुरुवात केली. रस्त्यावर वाहनांची गर्दी असल्यामुळे त्या टॅक्सी चालकासं ओव्हरटेक करून जागा देणे शक्य नव्हते. तरी देखील तो जोर जोरात हॉर्न वाजवत होता.वाहतूक सुरळीत होताच तो टॅक्सी चालक अचानकपणे एकदम अनिल अग्रवाल च्या गाडीचा ओव्हरटेक करून त्यांच्या गाडीसमोर स्वतःची गाडी थांबवली. अनिल अग्रवाल ने गाडीतून खाली उतरून टॅक्सी चालकास "अरे तुझे गाडी चलाना आता है क्या, अभी हम लोग मर जाते, गाडी ब्रिज के ऊपर गीर जाती तो" असे बोलले तेव्हा त्या टॅक्सी चालकने गाडी बाहेर उतरून शिवीगाळी करण्यास सुरुवात केली आणि अनिल अग्रवाल च्या अंगावर येऊ लागला. तेवढ्यात अनिल अग्रवाल च्या अंगरक्षकांनी त्याचा अटकाव करताच. त्या टॅक्सी चालकाने दोघांना धक्काबुक्की करून त्यांच्या गालावर चापट मारली आणि स्वतःच्या टॅक्सी कडे धावत जाऊन टॅक्सी मधून चाकू आणला व अनिल अग्रवाल च्या अंगावर मारण्याच्या उद्देशाने " रुक तुझे अब में जान से मार डालता हूं" असे बोलून त्याने अग्रवाल यांना मारण्यासाठी चाकु बाहेर काढला.तेवढ्यात अनिल अग्रवाल च्या अंगरक्षकांनी त्याच्या हातातला चाकू हिसकावून घेऊन स्वतःच्या हातात घेतला आणि त्याला पकडले.सदर वेळी वाहतूक जमा झाल्यामुळे अनिल अग्रवाल आणि त्यांचे अंगरक्षक तसंच मुलगा तात्काळ त्या टॅक्सी चालकासह तिथल्या परिसरातील कुरार पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.सदर टॅक्सी चालकास पोलीसांनी त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव शुभम सुखाराम चौधरी वय २० वर्ष धंदा टॅक्सीचालक राहायला सायन (मुंबई) येथे असे सांगितले.या संपूर्ण घटनेत त्या टॅक्सी चालकाने शिवीगाळी करून भर रस्त्यात जीवघेणा हल्ला करण्याची तक्रार कुरार पोलीस ठाण्यात अनिल अग्रवाल यांनी नोंदवली आहे.तसेच, त्या टॅक्सी चालकाविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करावी असे सांगितले आहे.या कृत्यामुळे अनिल अग्रवाल यांना त्यांच्यावर पाळत ठेवणारे अन्नधान्य माफियांच्या टोळीतील हा गुंडा असू शकतो असा संशय आहे. त्यामुळे अनिल अग्रवाल यांच्या जीवनास धोका असल्यामुळे त्यांना पोलीस संरक्षण मिळावे असे त्यांचे म्हणणे आहे.सदर प्रकरणाचा तपास कुरार पोलीस ठाणे करत आहे.

# पोलीसांच्या चुकीच्या कार्यपध्दती मुळे गरिबांच्या हक्काचा रेशन मालाचा काळा बाजार करणारे माफिया अजूनही मोकाट

गेल्या काही दिवसात गरिबांच्या हक्काचे हजारो किलोचे धान्य रेशन दुकानदाराकडून काळाबर करण्यासाठी इतरत्र साठवल्याचे उघडीस आले आहे.तर अशीच काहीशी घटना बोरिवली मधील न्यू लिंक रोड येथे झाली. सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार शिधावाटप अधिकारी व पोलीस अधिकारी यांनी न्यू लिंक, टॉमॅटो मार्केट च्या मागे श्री.उत्तम लक्ष्मण म्हात्रे यांच्या पडीक जमिनीवरील गोदामात तपासणी करीत असताना त्या ठिकाणी तांदूळ आणि गहू जमिनीवर पडल्याचे दिसून आले. तसेच तिथे मध्य प्रदेश, हरियाणा व पंजाब राज्याच्या शासकीय गोन्या देखील आढळून आल्या.हि जागा उत्तम म्हत्रे यांनी अब्दुल इब्राहिम याला भाडयाने दिली असून सुद्धा तिथे साई ट्रेंडींग या कंपनीच्यानावाने अन्नधान्य पुरवटा करण्याचा व्यवसाय चालतो . परंतु, त्या जागेवर व्यवसाय चालवण्याचा तसेच अन्नधान्य साठवणूक करण्याची परवानगी आणि महानगर पालिके कोणतेही कागद पत्र नसल्याचे पोलीस अधिकारींना दिसून आले.गुन्हा दाखल करणारे साक्षीदार श्री. अनिल जयगोपाल अग्रवाल यांनी दिलेल्या जबाबानुसार भारतीय खाद्य निगमाची गाडी क्र. एम.एच.४८ टी ७३४३ मधून रेशनिंगचा माल खाली करून तोच सरकारी गोणीतून काढून खाजगी गोणीमध्ये भरून गाडी क्रमांक एम.एच.१०सी.आर४१९७ या ट्रॅक मध्ये भरला जात होता. तर तिथेच काम करीत असलेल्या मुकादम ने असे सांगितले की , दिनानाथ यादव, राजकुमार केशरवानी, दिलीप ठक्कर आणि अशोक ठक्कर हे मिळून हा धंदा चालवताता.ट्रक मध्ये माल भरत असताना अनिल अग्रवाल यांनी त्या सर्व गुन्हयाचे व्हिडीओ चित्रण केले तेव्हा दिनानाथ यादव आणि राजकुमार केसरवाणी या दोघांनी अनिल अग्रवाल याना धमकी दिली कि 'तुला जे करायचे आहे ते कर 'तर त्याच वेळी त्या घटने ठिकाणी दोन पोलीस शिपाई आले तेव्हा अनिल अग्रवाल यांनी पोलीसांना या ठिकाणी रेशच्या अन्नधान्यचा काळा बाजार करण्यात येत आहे हा गुन्हा सांगत असतानाच,दिनानाथ यादव आणि राजकुमार केसरवाणी या दोघांनी पळ काढली.या गुन्ह्याचे सूत्रधार अब्दुल शेख आणि बाबासाहेब चौगुले यांना एम.एच.बी.पोलीस ठाणे अंतर्गत दाखल असलेल्या वि.स्था.गु.नो.क्र.१७/२०२० कलाम जीवनावश्यक कायदा १९५५,३,७,८,९ तसेच बॉम्बे रेशनिंगओरीया शेड्युल कमांडिंग ऑर्डर कलम ३,४ प्रमाणे या गुन्हेगारांना २४/९/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे. हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्या कारणाने कलमाव्यतिरिक्त अजून गंभीर तपास अधिकारी यांनी दाखल करणे आवश्यक होते. परंतु तपासी अधिकाऱ्यांनी हा गुन्हा नोंद करताना हलगर्जी पण केला. तसेच मा.६८ वे न्यायालयामध्ये प्रथम रिमांडकाची अटक आरोपी यांना हजार केले असताना. पोलीस कस्टडीची मागणी न करता न्यायालयीन कस्टडी बद्दल स्पष्ट मागणी करण्यात आली. त्या वेळी सरकार पक्षातर्फे अनिल अग्रवाल यांनी सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून गुन्हेगारांना पोलीस कस्टडी मिळावी यासाठी मा. न्यायालयास अशी विनंती केली.तेव्हा या गुन्ह्याची बाब हि मा.न्यायालयाच्या लक्षात आली.तसेच या गुन्ह्याचे इतर महत्वाचे पाहिले आरोपी याना अजून अटक न केल्याचे दिसून येत असल्या कारणाने अनिल अग्रवाल यांनी सरकार पक्षातर्फे कलम वाढ करण्याबाबत मा. न्यायालयात लेखी अर्ज दिले आहे आणि या गुन्ह्याची स्वतः लक्ष घालून योग्य ती कारवाई करावी अशी विनंती देखील केली आहे.

# आर्थिक फायद्यासाठी जुगार खेळणाऱ्या आरोपीयांवर पालघर पोलीसांनी केली कारवाई"

सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक. २५/१०/२०२० रोजी सुमारे ३:४५ वा डहाणू पोलीस ठाणे हद्दीत काही माणसं इसम जुगार खेळत असल्याची गुप्त बातमी पोलीसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या सहाय्याने सदर ठिकाणी पोलीसांनी छापा टाकला. तर त्या ठिकाणी आरोपी नावे:१) गोपाळ वसंत मेहेर, वय ४२वर्ष राहायला.प्रभू पाडा,पालघर.२) राजेश पंढरी दुबळ दुबळा, वय ३८ वर्षे, राहायला. सावता पालघर.३) शशिकांत पालिया माच्छी वय ३५ वर्षे, राहायला. सावता पालघर.४)अशोक कमला यादव वय ३७ वर्षे, राहायला. वाणगाव खरखडा पालघर.५) यासीन इस्माईल नमाजी वय ५२ वर्षे, राहायला. केटी पालघर. ६)जुबेर चांदअली खान वय ५२ वर्षे, राहायला. बोईसर खारपाडा पालघर.७) गफर मेमन वय ६० वर्षे, राहायला. अब्बास बोरीची चाळ पटेलपाडा, पालघर.८) श्री.चंद्रकांत कल्याणजी शहा वय ६२ वर्षे, राहायला. इराणी रोड पालघर.सदर सर्व आरोपी पालघर जिल्ह्यात राहत असून यांना दिनांक. २६/१०/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मोकळ्या जागेत हे आरोपी एकूण २,७३,३५४/रुपये किंमतीचा जुगार खेळण्याची साधने स्वतःकडे बाळगून त्यावर जुगार पैसे लावून खेळत व खेळवीत असताना पोलीसांना आढळून आले आहे. म्हणून डहाणू पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्रमांक १८६/२०२० मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) प्रमाणे, हा गुन्हा आरोपीयांवर दाखल करून पुढील तपास चालू आहे.सदर गुन्ह्याची कारवाई मा.पोलीस उप.अधिकारी गृह पालघर श्री.शैलेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभाग पोलीस अधिकारी कार्यालय बोईसर विभाग येथील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे

# अभिनेत्री प्रितिकासह दोघांना गांजा खरेदी-विक्रीप्रकरणी अटक

सिनेअभिनेता सुशांत सिंह राजपूत आत्महत्येनंतर ड्रग्ज प्रकरणाचा छडा लावण्यात अमली पदार्थ विरोधी पथकाच्या (एनसीबी) अधिकाऱ्यांना आलेले यश, याच गुन्ह्यांत बॉलीवूडच्या दिग्गज अभिनेत्रीची झालेली चौकशीची घटना ताजी असताना शनिवारी एका अभिनेत्रीसह दोघांना गांजाचा खरेदी-विक्रीप्रकरणी नारकोटीक्स कंट्रोल ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. फैसल मोहम्मद यासिन शेख आणि प्रितिका हकमसिंग चौहान अशी या दोघांची नावे आहेत. यातील प्रितिका ही मालिका अभिनेत्री असून तिने काही सिनेमातही काम केल्याचे सांगण्यात आले. अटकेनंतर या दोघांनाही रविवारी लोकल कोर्टात हजर करण्यात आले होते. यावेळी त्यांना 8 नोव्हेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. अंधेरीतील वर्सोवा, मच्छीमार कॉलनीजवळ काहीजण गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती एनसीबीच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. या माहितीनंतर या पथकाने तिथे साध्या वेशात पाळत ठेवली होती. काही वेळाने या पथकाला तिथे एक तरुण संशयास्पदरीत्या फिरताना दिसून आला. त्यानंतर तिथे एक महिला आली, या दोघांमध्ये कुठल्या वस्तूची देवाणघेवाण सुरू असतानाच या पथकाने या दोघांनाही चौकशीसाठी ताब्यात घेतले. यावेळी त्यांच्याकडे या पथकाने 99 ग्रॅम वजनाचा गांजा सापडला. चौकशीत आरोपीचे नाव फैसल शेख आणि महिलेचे नाव प्रितिका चौहान असल्याचे उघडकीस आले. प्रितिका ही अभिनेत्री असून सध्या ती मालाड येथील एस. व्ही. रोड, दादी शेठ रोडच्या न्यू संगीता अपार्टमेंटमध्ये राहते. तिने संकटमोचन महाबली हनुमान या मालिकेत काम केले होते. तसेच झमेला या सिनेमातही तिची एक छोटी भूमिका होती. गांजाची खरेदी-विक्री केल्याप्रकरणी या दोघांविरुद्ध नंतर गुन्हा नोंदविण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच या दोघांना एनसीबीच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. अटकेनंतर त्यांना लोकल कोर्टाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यानंतर फैसलला तळोजा तर प्रितिकाला भायखळा महिला कारागृहात पाठविण्यात आले होते. न्यायालयीन कोठडी सुनावल्यांनतर या दोघांनी जामिनासाठी अर्ज केला आहे. सोमवारी या जामीन अर्जावर सुनावणी होणार आहे.

# शरीराला घातक असणाऱ्या तंबाखूजन्य पदार्थाची आयात निर्यात करणाऱ्या 2 आरोपींना कासा पोलीस ठाणे यांनी केले जेरबंद

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार डहाणू येथील घोळ टोल नाका मुंबई वाहिनीवर ह्युदाई वेरना या कार मधून तंबाखूजन्य आणि विषारी पदार्थांचे आयात निर्यात करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात आली. शरीरास प्राणघातक असल्याची पुरेपूर कल्पना असून देखील अशा विषारी पदार्थांची आयात निर्यात केली जात होती, या गुन्ह्याची कडक कारवाई सहा.पोलीस निरीक्षण उमेश पाटील आणि प्रभारी अधिकार कासा पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या गुन्ह्यात दोन आरोपी सामील असून त्यांची नावे,१) गुलमोहम्मद साफिया अहमद खान, वय-३६वर्ष २)शावान जुबेर अहमद शेख वय २२-वर्ष यांच्यावर १७८/२०२० कलम भा.द.वि. कलम ३२७,२७२,२७३,१८८,३४ अन्न सुरक्षा मा.न.दे.का. २००६ चे. कलम. २६ (२) (आय), २७(१), ३०(२) (ए), ३(१) (झेड.झेड) (आय), ३(१) (झेड.झेड) (व्हि) शिक्षा कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करून १९ ऑक्टोंबर रोजी अटक करण्यात आली.

आरोपींच्या ताब्यातून तब्बल:

१)३८,८४८/ रु. किंमतीचे ८ प्लॅस्टीकच्या गोणी त्यामध्ये केसर युक्त विमल पान मसाला, बोलो जुबा केसरी ब्ल्यू रंगाचा पाकीट प्रत्येक गोणीमध्ये २२ पाकिट असे एकूण १७६ पाकिटे २)२४,९६०/ रु.किंमतीचे प्लॅस्टीकच्या गोणी त्यामध्ये केसर युक्त विमल पान मसाला बोलो जुबा केसरी, केसरी रंगाचे पाकीट,प्रत्येक गोणीमध्ये ५२ पाकीट असे एकूण २०८ पाकीटे

३)३७,४००/ रु.किंमतीचे प्लॅस्टीकच्या गोणी त्यामध्ये केसर युक्त विमल पान मसाला बोलो जुबा केसरी काळे निळे रंगाचे पाकीट प्रत्येक गोष्टीमध्ये ५०पाकीटे असे एकूण २०० पाकीटे

४)५,१४८/रु.किंमतीचे ३ प्लॅस्टीकच्या गोणी त्यामध्ये एक तंबाखू काळे-निळे रंगाचे पाकीट प्रत्येक गोणीमध्ये ५२पाकीट असे एकूण १५६ पाकीटे

५) ६,२४०/रु.किंमतीचे ४ प्लॅस्टीकच्या गोणी त्यामध्ये वि-१ तंबाखू केसरी रंगाचे पॅकेट प्रत्येक गोणीमध्ये ५२ पाकीट असे एकूण २०८ पाकिटे

६) ४,६२०/ रु. किंमतीचे १० लहान प्लॅस्टीकच्या गोणी त्यामध्ये वि- १ तंबाखू जांभळ्या रंगाचे पॅकेट प्रत्येक गोणीमध्ये २१ पाकीट असे एकूण २१० पाकिटे

७)३,००,०००/ रु. किंमतीची ब्लू रंगाची ह्युंदाई वेरना कार नंबर एम. एच.०४. डी.एन.७१९८ जु.वा.किं.सु असा एकूण ४,१३,२१६ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच अशा प्रकारच्या तंबाखूजन्य आणि विषारी पदार्थांची निर्यात कुठेही आढळली तर त्यावर कडक कारवाई करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. शरीराला इजा करणारे आणि प्राणघातक असतील अशा कोणत्याच अन्नपदार्थांचे सेवन करू नये आणि त्यांची आयात निर्यातही देखील करू नये असे आव्हान कासा पोलीस ठाणे जनतेला दिले आहे. या प्रकरणामुळे मुंबईतील सर्व टोल नाक्यावर येणाऱ्या प्रत्येक वाहतूक मालाची काटेकोर पद्धतीने तपासणी केली जात आहे.

# मोकाट सुटले गुन्हेगार पोलिसांवर उचलला हात कायदा हातात घेणाऱ्या ला पाठवा हवालात

श्री. एकनाथ श्रीरंग पार्टे ह्या वाहतूक पोलिसावर हात उचलणारी महिला सादविका तिवारी आणि तिच्या साथीदार मोहसीन खाण ह्या दोघांनाही अटक! सदर महिलेने मुंबई येथील काळबादेवी ट्राफिक डिव्हिजन मधील एकनाथ श्रीरंग पार्टे या वृद्ध पोलीस हवालदार यांना एका महिलेने भररस्त्यात मारहाण केली होती. मोटार सायकल वरून जाताना हेल्मेट बद्दल विचारले असता, राग येऊन 'सादविका रमाकांत तिवारी' या महिलेने मारहाण केली आणि तिच्या बरोबर असलेल्या 'मोहसीन निजामुद्दीन खान' या युवकाने घटनेचा व्हिडिओ काढला आणि व्हायरल केला, पोलिसांनी या दोघांनाही अटक केली आहे.घडलेल्या घटनेच्या अनुशंगाने एल टी मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ५७१/२०२० आई. पी. सी. ३५३, ३३२,५०४,५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी :- एकनाथ श्रीरंग पार्टे, पोलीस हवालदार. ३०६५६नेमणूक:- काळबादेवी ट्राफिक डिव्हिजनआरोपी क्र. १:- सादविका रमाकांत तिवारीवय :- ३० वर्षरा. ठी :- मशीद बंदरआरोपी क्र. २ :- मोहसीन निजामउददीन खानवय :- २६, भेंडी बाजार

# कांद्याचे भाव मुंबईत कडाडले

बाजारात मागणी वाढल्याने कांद्याच्या दराने पुन्हा उसळी मारली आहे.भाज्यांचे भाव वाढलेले असतानाच कांद्याच्या भावातही वाढ झाली आहे . मुंबईत कांद्याचा भाव प्रतिकिलो १०० इतका झाला आहे राज्यभर झालेल्या अतिवृष्टीचा मोठा फटका कांद्याच्या पिकाला बसला असून हंगामही लांबवण्यात आले आहे.त्यामुळे बाजारात जुन्या कांद्याच्या दराने उसळी मारली होती. महाराष्ट्राच्या विविध भागातील कांद्याला परराज्यातून वाढलेली मागणी आणि त्या तुलनेने स्थानिक भागातून पुरवठा कमी होत असल्याने कांद्याचे बाजारातील दर वाढले आहे.कांदे १० किलोंसाठी ७०० रुपयांपर्यंत पोचले आहे तर काही बाजारात कांदा आता ९० ते १००रुपये किलोपर्यंत पोहोचल्याने ऐन सणासुदीच्या काळात कांदा ग्राहकांच्या डोळ्यात पाणी आणणार आहे.

# राज्यपाल, मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने पनवेल महापालिकेला मिळाले वैद्यकीय अधिकारी

**पनवेल संघर्ष समितीच्या सततच्या रेट्यामुळे अखेर राज्य शासन नमले**



पनवेल/प्रतिनिधी पनवेल संघर्ष समितीने राज्यपाल, मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे पनवेल महापालिकेला पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी मिळाले आहेत. पालघर येथे जिल्हा प्रक्षिण केंद्राचे प्रशिक्षक आनंद गोसावी यांची पनवेल महापालिकेच्या वैद्यकीय अधिकारीपदी आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास यांनी नियुक्ती केली आहे. तब्बल दहा महिने हे पद रिक्त होते. संघर्ष समितीने सातत्याने रेटा लावल्याने अखेर पनवेल महापालिकेला न्याय मिळाला आहे. या नियुक्तीतून सत्ताधारी आणि विरोधकांना आणखी एक धोबीपछाड मिळाली आहे. पनवेल महापालिकेला स्थापनेपासून अवघ्या तीन ते चार महिन्यांपुरते डॉ. सचिन जाधव हे वैद्यकीय अधिकारी लाभले होते. महाविकास आघाडीच्या सरकारमधील आरोग्य खात्याचे मंत्री राजेश टोपे यांच्या विशेष कार्य अधिकारीपदी डॉ. जाधव यांची बदली झाल्यानंतर ते पद रिक्त होते. त्यानंतर कोविड काळात डॉ. राजेंद्र इटकरे आणि डॉ. सुनील नखाते यांच्याकडे तात्पुरता पदभार देण्यात आला होता. पनवेल संघर्ष समितीने प्रथम राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, आरोग्यमंत्री राजेश टोपे आणि प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. त्यानंतर मुख्यमंत्री ठाकरे यांनी स्वतः संघर्ष समितीच्या अर्जावर स्वाक्षरी करून महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे अहवाल मागविला होता. त्यानंतर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेवून समितीचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनी महापालिकेच्या आरोग्य खात्याला तातडीने पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी द्यावा, अशी मागणी केली होती. राज्यपाल कोश्यारी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुख्य सचिव संजय कुमार आणि आरोग्य खात्याचे प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास यांना लेखी आदेश दिल्यानंतर पनवेल महापालिकेला अखेर वैद्यकीय अधिकारी मिळाले आहेत. यामुळे कडू यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले आहे. पनवेल संघर्ष समितीच्या रेट्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांना आणखी एक धोबीपछाड देण्यात कडू यशस्वी झाले आहेत.

## पृष्ठ १ वरुन

### 'हिम्मत असेल तर सरकार

देणार आणि आम्ही काय बांग्लादेश मध्ये आहोत का

- दानवे बाप तुमचा असेल, माझा बाप इकडं आहे. भाडोत्री बाप स्विकारणार नाही. आहेराचे पाकिट घेवून पळणारे तुमचे बाप आहेत

- दहा तोंडी रावण महाराष्ट्रावर आलाय. एक म्हणतोय, महाराष्ट्र हे पाकव्याप्त काश्मीर आहे. घरी खायला मिळत नाही म्हणून मुंबईत यायचं आणि मुंबईवर बोलायचं शिवसेनेचा यंदाचा दसरा मेळावा साधेपणाने साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहाच्या हॉलमध्ये दसरा मेळावा साजरा होणार आहे. १९६६ साली शिवसेनेचा दसरा मेळावा पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केला. शिवाजी पार्कवर हा दसरा मेळावा गेल्या पाच दशकांपासून साजरा होत आहे. ३० ऑक्टोबर १९६६ साली शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा शिवाजी पार्कवर पार पडला. तेव्हापासून या दसरा मेळाव्याची परंपरा आहे. एकच पक्ष एकच मैदान असा या दसरा मेळाव्याचं वेगळेपणं आहे. हे वेगळेपण शिवसेनेने जपलं आहे. फक्त शिवसैनिकच नाहीत तर संपूर्ण जनता 'दसरा मेळावा' पाहण्यास आणि खास करून यामधील भाषण ऐकण्यास उत्सुक असते. गेल्यावर्षीच्या म्हणजे २०१९ च्या दसरा मेळाव्यात '२०२० मध्ये शिवसेनेचा मुख्यमंत्री असेल', असं शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी भाकीत केलं होतं. आणि हे भाकीत खरं ठरलं आहे. यंदा शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यंदा मुख्यमंत्री म्हणून देशाला संबोधित करतील. यंदाचा शिवसेनेचा ५३ वा दसरा मेळावा आहे.

### आयडॉलची बीए व बीकॉमची

विनाअडथळा पार पडली. दोन्ही परीक्षेमध्ये ४२०२ म्हणजे ८४.०७ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. सकाळी झालेल्या बीएच्या परीक्षेमध्ये ३०४९ विद्यार्थी तर दुपारी झालेल्या बीकॉमच्या परीक्षेत ११५३ विद्यार्थी उपस्थित होते.तृतीय वर्ष बीएच्या १४ विषयामध्ये परीक्षा घेण्यात आली. यामध्ये ३७०७ विद्यार्थ्यांपैकी ३०४९ विद्यार्थ्यांनी म्हणजेच ८२ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. बीकॉमचा उपयोजित समूहाचा एक विषय होता. यामध्ये १२९१ विद्यार्थ्यांपैकी ११५३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. बीकॉममध्ये ८९.३१ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी विद्यापीठाकडून २० ते २५ ऑक्टोबरपर्यंत सहा वेळेस ८०५४ विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेतली. कॅमेरा असलेल्या कोणत्याही स्मार्टफोनवर, लॅपटॉप किंवा डेक्सटॉप कॉम्प्युटरवर परीक्षा घेण्यात आली. एकाच वेळेस सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी लॉगिन करू नये म्हणून परीक्षेसाठी चार तासाच्या वेळेचा स्लॉट दिला. यामुळे परीक्षेसाठी एकाच वेळी विद्यार्थ्यांनी गर्दी केली नाही. विद्यार्थ्यांनी त्यांच्या सोयीनुसार परीक्षेसाठी एक तास निवडला. यामुळे विद्यार्थ्यांची विभागणी झाली व परीक्षा व्यवस्थितरित्या पार पडली. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेचे प्रवेशपत्र मिळाले आहे, त्या सर्व विद्यार्थ्यांना एसएमएसवर परीक्षेचा संदेश पाठविला, त्यांच्या ईमेलवर परीक्षेची लिंक पाठविण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी १० दूरध्वनी असलेली हेल्पलाईन सुरु केली. एखाद्या विद्यार्थ्याकडे परीक्षेचे प्रवेशपत्र असेल पण काही कारणामुळे लिंक गेली नाही तर त्याला हेल्पलाईनवरून लिंक पाठविली गेली. हेल्पलाईन सेवा सकाळी ९ ते सायंकाळी ६ पर्यंत उपलब्ध आहे.

### सावधान ऑनलाइन समान

मोबाइल वितरित केला आणि निघून गेला. त्या युवकाने मोबाईल बॉक्स उघडताच त्याच्या पायाखालची जमीन सरकली. बॉक्समध्ये मोबाइलऐवजी कपडे धुण्याचासाबण होता. या तरुणाने कंपनीकडे तक्रार केली तसेच पोलिसांनाही माहिती दिली. तपासणीनंतर गाझीपूर पोलिसांनी फसवणूकीच्या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित सोहन लाल कुटुंबासमवेत मयूर विहार फेज -3 मध्ये राहतो. १९ ऑक्टोबरला सोहन लाल याने नामांकित ऑनलाइन वस्तू विकणाऱ्या कंपनीकडून मोबाइल बुक करण्यात आला होता. मोबाइल बुक केल्याच्या चार दिवसानंतर डिलिव्हरी मॅन मोबाईलसह त्याच्या घरी आला. आरोपीने युवकाला वस्तू डिलेव्हर केली आणि घाईघाईने निघून गेले.सोहनने मोबाईल बॉक्स उघडला आणि त्यात त्याला साबण दिसला. तातडीने पीडिते तरुणाने कंपनीला ऑनलाइन कळविले. यानंतर ही बाब पोलिसांना कळविण्यात आली. तपासणीनंतर गाझीपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केवळ सामान वितरित करणाऱ्या मुलानेच बॉक्समधून मोबाईल लंपास करून त्यात साबण टाकला असा पोलिसांचा अंदाज आहे.

### कोरोनासोबत च्या युद्धात

मुंबईला मोठा दिलासा मिळत असल्याचंही दिसून येत आहे. कोरोना व्हायरसचा अतिशय वेगानं फैलाव होत असणाऱ्या Mumbai मुंबई शहराची कोरोनाशी सुरु असणारी झुंज बऱ्याच अंशी यशस्वी ठरताना दिसत आहे. मुख्य म्हणजे गणेशोत्सव आणि दरम्यानच्या सणासुदीच्या दिवसांमध्ये कोरोना संसर्गानं पुन्हा एकदा संकटाची छाया गडद केली होती. पण, आता मात्र पुन्हा एकदा कोरोनाचा पराभव होताना दिसत आहे. नव्यानं समोर आलेल्या आकडेवारीनुसार मुंबईत रूग्ण दुप्पट होण्याचा कालावधी आता 132 दिवसांवर पोहोचला आहे. शहातील 24 विभागांपैकी 23 विभागातही हा कालावधी 100 दिवसांच्या वर आहे. फक्त आर दक्षिण या विभागातच रूग्ण दुप्पट होण्याचा कालावधी शंभरपेक्षा कमी म्हणजेच 97 दिवसांवर आहे.

### वर्दीवर हल्ला! वाहतुकीवरुन

दिवसांपूर्वी वाहतुकीचे नियमन करणाऱ्या महिला पोलिसांशी एका सेवानिवृत्त महिला पोलीस निरीक्षकाने हुज्जत घालण्यास सुरुवात केली . यावेळी तिने वरिष्ठांना बोलावून घेतल्यावर त्यांच्याशीही हुज्जत घालणाऱ्या या निवृत्त महिला अधिकाऱ्यास उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी शहर पोलीस ठाण्यात नेण्याचे आदेश दिले. यावेळी या महिला अधिकाऱ्याने आपली कार रस्त्यात आडवी लावून रास्ता बंद केल्यावर पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन शहर पोलीस ठाण्यात आणले येथे तिने असाच उद्दामपणा सुरु ठेवत चौकशी करणाऱ्या महिला पोलीस उपनिरीक्षकाच्या हाताचा चावा घेतला .पोलिसांवर हात उचलणाऱ्यांना गृहमंत्री अनिल देशमुख यांनी चांगली अद्दल घडवायचा इशारा दिला आहे. पोलीस खात्यातून सेवानिवृत्त झालेल्या या महिला अधिकाऱ्याच्या उद्दाम वर्तनानंतर पोलिसात सरकारी कामात अडथळा, कोरोना नियमांचे उल्लंघन आणि भादविक 353, 332, 324, 341, 323, 506, 268, 269, 34 प्रमाणे पोलिस कॉन्सटेबल कविता चोपडे यांनी तक्रार दिली असून यातील निवृत्त महिला अधिकारी व तिच्या मुलावर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अशा लोकांवर जरब बसली पाहिजे : संजय राऊत"पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई होणं गरजेचंच आहे. कर्तव्याचं पालन करणाऱ्या हवालदारावर हात टाकणारे हे लोक कोण आहेत आहेत? यांच्यात हिंमत कुठून येते? यात सरकार कोणाचं आहे हा प्रश्न नाही. मुंबई पोलीसच नाही तर देशातल्या कोणत्याही पोलिसांवर हात टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हायलाच हवी. या महिलेने केलेला गुन्हा किती अक्षम्य आहे हे पोलिसांनी आणि न्यायालयाने दाखवण्याची गरज आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबई पोलिसांना माफिया म्हणणं, त्यांच्यावर घाणेरडे आरोप करणं, मुंबई पोलिसांचं मानसिक खच्चीकरण करण्याची जी मोहीम राबवली होती, त्यातून अशा लोकांना बळ मिळतं. पोलीस राजकारणासाठी नाहीत. पोलीस असुरक्षित नाही. असे माथेफिरु सगळीकडे असतात. हे माथेफिरुपणाचं लक्षण आहे. कायदा, पोलीस आमचं काय बिघडवणार आहेत, अशा यांची मानसिकता आहे. पोलिसांनी त्यांचं बिघडवून दाखवावं. पोलिसांकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत होणार नाही, अशी जरब बसली पाहिजे," अशी प्रतिक्रिया शिवसेना खासदार संजय राऊत म्हणाले.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रभाग कार्यालय क्र. ५**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार

**// नोटीस //**

सर्व संबधितांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर वसुली अंतर्गत **फ्लैट नं. ००१, बी विंग, अस्मिता उपहार ३ , को.ओ.हा.सो., पुनम सागर कॉपलेक्स, मीरारोड पूर्व, ठाणे ४०११०७** येथील मनपा मालमत्ता क्रमांक **ई१२००३२३२९०१४/बी००१** ही मालमत्ता महानगरपालिका दप्तरी **रामअसरे** यांचे नावावर आहे. परंतु रामअसरे यांचा मृत्यु दि ०३/०२/२०१६ रोजी झाला. त्यामुळे सदर मालमत्ता **मुलगा** या नात्याने **जितेन्द्र रामअसरे कनोजीया** यांनी महानगरपालिका कडे अर्ज करुन मालमत्ता नावे करणेकरीता मागणी केलेली आहे. तरी सदर मालमत्तेबाबत कोणतीही हरकत / अगर तक्रार असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांचे कार्यालयात लेखी आवश्यक कागदपत्रासह सादर करावी. मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही. यांची संबधितांनि नोंद घ्यावी.

सही
प्रभाग अधिकारी
**प्रभाग समिती कार्यालय क्र.५**
मिरा भाईंदर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार २७ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर-२०२०



## संपादकीय...

# यांना कोणी वाली आहेत का?

गणेशोत्सव आला, पोलीस बंदोबस्ताला उभा राहिला.. नवरात्र आले, पोलीस बंदोबस्तात व्यस्त झाला.. महापूर आला, पोलीस मदतीसाठी धावला.. निवडणूक आली, पोलिसांचा खडा पहारा सुरू झाला.. गुन्हा घडला, तिथे पोलीस पोहोचला.. अपघात झाला पोलीस पोहोचला. दंगेखोरांना धडा शिकवणारे पोलीसच ! स्वत:च्या कुटुंबाला वेळ न देता माजाच्या सुरक्षेची जबाबदारी उराशी बाळगून ती पार पाडणाराही पोलीसच! सद्रक्षणाय खलनिग्रहणाय या दोन शब्दातील प्रत्येक अक्षराच्या अर्थ प्रत्यक्षात उतरवत पोलीस आपले कर्तव्य बजावतात. कर्तव्य बजावताना हजारो पोलिसांनी आपले बलिदान दिले. मात्र पोलिसांच्या या बलिदानाचा समाजाला नेहमीच विसर पडल्याची खंत वाटते.देशसेवेचे कर्तव्य बजावण्याची शपथ घेऊन पोलीस आपल्या सेवेला सुरुवात करतो. पोलीस दलात सेवा बजावताना समाजाला घातक ठरणाऱ्या प्रत्येक संकटाचा सामना करण्याचा त्याचा प्रयत्न असतो. सीमेवर लढणाऱ्या सैनिकाला सीमेपलीकडचा शत्रू माहीत असतो, मात्र देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पोलिसाला त्याच्या आजूबाजूला वावरणाऱ्या समाजातील विघातक प्रवृत्तींचा शोध घेऊन त्यांचा बीमोड करावा लागतो. यात दुर्दैवाने त्याला काही वेळा कौटुंबिक नाती, ज्ञाती बांधव, आपलेच मित्र वा सहकारी यांच्याशी सामना करावा लागतो.सामाजिक सुरक्षितेला प्राधान्य देताना पोलिसांना काही वेळा जीव गमावण्याची वेळ येते. देशसेवेला वाहून घेताना दिलेले बलिदान यापेक्षा आणखी कोणते मोठे कर्तव्य असू शकते? समाजाच्या सुरक्षेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणारा पोलीस स्वत:ची कौटुंबिक जबाबदारी मात्र त्याच प्रामाणिकपणाने पार पाडू शकत नाही. सगळे जेव्हा उत्साहात सण, उत्सव सहकुटुंब साजरे करत असतात, तेव्हा पोलीस हातात लाठी घेऊन बंदोबस्तात दिवस घालवत असतो. ते पोलिसांचे कर्तव्यच आहे ते नाकारता येत नाही. हे कर्तव्य बजावण्याची शपथ घेऊनच ते या सेवेत रुजू झालेले असतात. ज्याप्रमाणे सीमेवर जवान देशाच्या शत्रूशी लढत असतो अगदी त्याचप्रमाणे पोलीस देशाअंतर्गत गुन्हेगारी प्रवृत्तीशी लढा देत असतो. दंगल झाली, आंदोलन झाले की पोलीस दगडफेकीसारख्या घटनांचा सामना करत ऊन-पावसाची तमा न बाळगता खडा असतो. महाराष्ट्राच्या नक्षली भागात झालेल्या हल्ल्यात कितीतरी पोलीस शहीद झाले आहेत. सव्वीस-अकराच्या मुंबईवरील अतिरेकी हल्ल्यात प्राणाची बाजी लावत पोलिसांनी कर्तव्य बजावले. या हल्ल्यात अतुलनीय असे शौर्य दाखवत पोलिसांनी इतिहास घडवला. सातारा जिल्ह्यातील तुकाराम ओंबळेंसारख्या पोलीस कर्मचाऱ्याने दहशतवादी अजमल कसाबला जिवाची बाजी लावून पकडले.अशी बलिदानाची किती उदाहरणे द्यावीत? यावर्षी महाराष्ट्र पोलीस दलातील १७ कर्मचारी शहीद झाले आहेत. अनेकदा घराबाहेर पडणाऱ्या पोलिसांना पुन्हा घरी कधी आणि कशा रूपात परत यावे लागेल याची कल्पना पण नसते. वरवर साध्या व किरकोळ वाटणाऱ्या छोट्या कारवाईवेळी संशयितांच्या हिंसक पावित्र्यामुळे पोलिसांना शारीरिक इजांना बळी पडावे लागल्याची उदाहरणे ज्ञात आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात पोलिसांनी अनेक वेळा धाडसी कामगिरी बजावली आहे. मात्र याच इतिहासात आणि वर्तमानात पोलिसांना समाजाकडून मिळणारी वागणूक पोलिसांची खंत वाढवणारी आहे. कर्तव्य बजावताना जीवन संपलेल्या पोलिसांना किंवा हल्ल्यांमध्ये शहीद झालेल्या पोलिसांना समाजाकडून दुजाभावाची वागणूक मिळते ही खंत वाढत चालली आहे. पोलीस शहीद झाल्यास कर्तव्यावर असताना त्याचा अपघाती मृत्यू झाल्यास; त्याच्या कुटुंबीयांना योग्य वेळेत सेवा मिळत नाही. अनुकंपा तत्त्वावरील नोकरीची संधी मिळवताना अक्षरश: पोलीस कुटुंबाची दमछाक होते. ज्याने उभे आयुष्य देशसेवेत घालवले त्या पोलिसांच्या कुटुंबाची फरपट डोळ्यात पाणी आणणारी असते. या शूरवीरांचे स्मरण स्फूर्तिदायक ठरावे यासाठी २१ ऑक्टोबर हा पोलीस शहीद दिन म्हणून आयोजित केला जातो. हे शौर्य इतिहासात गौरवशाली स्मृतिचिन्ह बनले पाहिजे. शहीद पोलीस जवानाच्या शौर्याची गाथा गायलाच हवी!




# एका वृत्त वाहिनीमुळे कायद्याची ऐसी के तैसी

## केंद्रीय अन्वेषण विभाग महाराष्ट्रात परवानगीविना कोणत्याही नव्या प्रकरणाची छाननी करू शकणार नाही, या निर्णयामागची कारणे 'बहुराज्यीय' डावपेचांत शोधता येतात

राज्य सरकारांनी आपले ऐकावे यासाठी आपण काय करीत आहोत, असा साधा प्रश्न देखील या राजकारण धुरंधरांना पडू नये?थोरल्यांनी थोरलेपणाचा आब राखला नाही तर धाकटे अधिक धाकटे होतात. पण त्यांना काही सुनावण्याचा अधिकार थोरल्यांनी गमावलेला असतो. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या- म्हणजे सीबीआयच्या-चौकशी अधिकारावरून महाराष्ट्र सरकारने उचललेले पाऊल पाहिल्यावर वरील सत्याची जाणीव व्हावी. केंद्रीय अन्वेषण विभागास राज्यात यापुढे काही चौकशी करावयाची असेल तर राज्य सरकारची परवानगी अत्यावश्क असेल. या परवानगीशिवाय केंद्रीय अन्वेषण विभाग महाराष्ट्रात कोणत्याही नव्या प्रकरणाची छाननी करू शकणार नाही. अशा चौकशीचे त्या केंद्रीय यंत्रणेस राज्य सरकारकडून देण्यात आलेले 'आपोआप अधिकार' कायद्याच्या कलमावर बोट ठेवून काढून घेण्यात आले आहेत. राज्य सरकारची ही कृती केंद्र-राज्य संबंधांस निश्चितच नख लावणारी आहे यात शंका नाही. पण तसे राज्यांस सुनावण्याचा अधिकार केंद्राने शाबूत राखला आहे काय, हा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या उत्तरासाठी महाराष्ट्र सरकारच्या ताज्या निर्णयाची पार्श्वभूमी धांडोळावी लागेल.एका वचवच्या वृत्तवाहिनीवरील कारवाईत या प्रकरणाचे मूळ आहे. वृत्तनिवेदकास आपण न्यायालयाच्या खुर्चीत आहोत असे वाटू लागल्यास जे होईल ते अलीकडच्या काळात अनेक वृत्तवाहिन्यांचे झाले आहे. बराच काळ बैलगाडीच्या सावलीतून चालत राहणाऱ्या श्वानास वरील बैलगाडी आपल्यामुळेच चालत आहे, असा भास होतो. माध्यमांतील अनेक हे अशा भासमय वातावरणात सध्या जगताना दिसतात. सरकारपेक्षाही अधिक सरकारधार्जिणेपणा सिद्ध करण्यातील त्यांची अहमहमिका ही मनोरंजक खरीच; पण तितकीच बौद्धिक दारिद्र्य निदर्शकदेखील. त्यातूनच कोणा 'रिपब्लिक' वाहिनीने आपली दर्शक संख्या फुगवल्याचा आरोप झाला. भाजप सरकारचे अस्तित्व जणू आपल्यावरच अवलंबून आहे असा ठाम समज या वाहिनीचालकांचा झालेला असल्याने विरोधकांच्या नावाने जमेल तितका शिमगा करणे असा या वाहिनीचा कार्यक्रम असतो. वास्तविक यात नवीन काही नाही. नावीन्य असलेच तर ते या माध्यमाचे आहे. म्हणजे पूर्वी जेव्हा वृत्तवाहिन्या नव्हत्या तेव्हाही यजमानाचा कल पाहून त्याबरहुकूम वाटेल ते लिहिण्यास तयार असणारे अग्रलेखांचे शहेनशहा, बिरबल, अकबर आदी अनेक लेखनिक होतेच. कालानुरूप ते गेले आणि त्यांच्या भाऊबंदांच्या हाती लेखणीच्या ऐवजी कॅमेरे आले. पण सत्ताख्यान गाण्याची वृत्ती तीच. तथापि त्या वेळी अशा काही लेखणी भाड्याने देणाऱ्यांची चौकशी झाली नाही. कारण 'अशा' माध्यमांनी तेव्हा कधी राजमान्यतेचा दावा केला नाही आणि त्यांना ती मिळालीही नाही. त्यामुळे हे प्रकरण तेव्हा आजच्यासारखे फसफसले नाही. आज ते निर्माण झाले कारण अराजमान्य उद्योगी राजमान्यतेचा व लोकमान्यतेचा दावा करू लागले म्हणून. आधुनिक काळात तंत्रज्ञानाने यांचे उद्योग उघड झाले आणि त्यातील काहींवर गुन्हा दाखल झाला. त्याची रीतसर चौकशी मुंबई पोलिसांमार्फत सुरू असताना उत्तर प्रदेशातही याच प्रकरणात गुन्हा नोंदला गेला आणि तेथील सरकारने तत्परतेने त्याची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपवली. ते सरकार कायदा-सुव्यवस्थेच्या बाबत किती हळवे आहे हे उन्नाव, हाथरस, विकास दुबे वगैरे प्रकरणांत सिद्ध झालेच आहे. त्याच हळवेपणातून या वृत्तवाहिनीची चौकशीही केंद्रीय अन्वेषण विभागाकडे दिली गेली असणार.त्याबरोबर हे प्रकरण बहुराज्यीय झाले. एकाच प्रकरणात दोन वा अधिक राज्यांत गुन्हे दाखल झाले असतील तर अशा प्रकरणांचा तपास नैसर्गिकपणे केंद्रीय यंत्रणेकडे जातो. याआधी महान कलाकार सुशांतसिंह राजपूत प्रकरणाच्या चौकशीत मुंबई पोलिसांनी हात पोळून घेतले होते. या युगपुरुष कलावंताचा मृत्यू झाला मुंबईत. पण तो मृत्यू संशयास्पद असल्याचा गुन्हा दाखल झाला बिहारमध्ये. ते कारण पुढे करत त्याची चौकशी केंद्रीय यंत्रणेकडे दिली गेली. त्यातून किती ऐतिहासिक सत्य या यंत्रणेने शोधून काढले हे साऱ्या देशाने अलीकडेच अनुभवले. मधल्यामधे वेळ तेवढा गेला आणि संबंधितांना जमेल तितका राजकीय फायदा उठवता आला. तीच गत 'रिपब्लिक' वाहिनीच्या चौकशीची होईल असे राज्य सरकारला वाटले असणार. तसेच या वाहिनीस मुंबई पोलिसांहाती सोडले तर अनवस्था प्रसंग उद्भवण्याचा धोका केंद्रास वाटला असणार. तो टाळण्याचा हमखास मार्ग म्हणजे या प्रकरणाची चौकशी मुंबई पोलिसांकडून काढून घेणे. यातील 'रिपब्लिक' योगायोगाचा भाग असा की आपली चौकशी केंद्रीय यंत्रणेकडे द्या अशी मागणी ही वाहिनीच करत होती. म्हणजे केंद्रीय यंत्रणेच्या 'चौकशीक्षमते'वर तिचा किती विश्वास आहे हे दिसून येते! त्या विश्वासास तडा न लागू देण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून हे प्रकरण परस्पर केंद्रीय यंत्रणेकडे दिले जाण्याची भीती राज्य सरकारला वाटली असल्यास ती अस्थानी म्हणता येणार नाही. म्हणून महाराष्ट्र सरकारने हे पाऊल उचलले आणि केंद्रीय यंत्रणेस दिलेले मुखत्यारपत्र काढून घेतले. जे राजस्थान, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल या राज्यांनी आधी केले होते, ते आता महाराष्ट्राने केले. झाले आहे ते इतकेच. पण त्यातून अनेक महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात.एका माध्यमगृहासाठी इतके काही करणे कितपत योग्य? या संदर्भात कृती करण्याचा अधिकार केंद्रास नि:संशय आहेच. पण तरीही अधिकार असले-नसलेले बहुतांश आपली कृती 'कशी दिसेल' याचा आधी विचार करतात. सुशांतसिंह राजपूत प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने नाक पुरेसे कापून घेतल्यानंतरही या प्रकरणी संबंधितांना शहाणपण येऊ नये? अलीकडे जरा कोणी केंद्राविरोधात काही भूमिका घेताना दिसला की ही वा अन्य कोणी केंद्रीय यंत्रणा चालून येते. फारुख अब्दुल्ला ते शिवकुमार असे याचे अनेक दाखले देता येतील. हे नेते कथित भ्रष्ट आहेत म्हणून त्यांची चौकशी योग्यच असे काही भाट यावर म्हणतील. त्यांचे रास्तच. पण मग अशा भ्रष्टाचाराच्या आरोपांचा बुक्का कपाळावर लावून भाजपत आलेल्यांचे काय? की ते भाजपच्या गंगास्नानात पुण्यवान झाले आणि म्हणून त्यांचे डाग केंद्रीय यंत्रणांना दिसेनासे झाले? हे असे या यंत्रणांना करावयास लावून आपण या केंद्रीय यंत्रणांची उरलीसुरली अब्रूदेखील मातीत घालत आहोत, हे संबंधितांना अजूनही कळत नसेल? दुसरे असे की राज्य सरकारांनी आपले ऐकावे यासाठी आपण काय करीत आहोत, असा साधा प्रश्नदेखील या राजकारण धुरंधरांना पडत नसेल तर आश्चर्यच म्हणायचे. राज्ये दोनच कारणांनी केंद्राची मिंधी राहतील. एक म्हणजे केंद्रातल्या सत्ताधारी पक्षाचीच सरकारे राज्यांत असतील तर. आणि दुसरे म्हणजे तशी नसतानाही केंद्र सरकार या राज्यांचे पालनपोषण करीत असेल तर. पण त्याची तर आपल्याकडे बोंब. राज्यांना देय असलेली वस्तू/सेवा कराची रक्कम द्यायचीही केंद्राची ऐपत नाही. राज्ये आपलीच न्याय्य रक्कम मागताना हात पसरून थकली. तेव्हा आर्थिक बाबतीत केंद्र काही देदीप्यमान करत आहे, म्हणून त्यांस साथ द्यावी अशी बिलकूलच परिस्थिती नाही. इतकेच काय ताजा वित्त आयोग तर राज्यांकडूनही संरक्षणाचा खर्च वसूल करा, असे सुचवू पाहतो. म्हणजे केंद्र आपली जबाबदारीही राज्यांवर ढकलणार असा त्याचा अर्थ. तेव्हा केंद्रासमोर राज्यांनी कोणत्या कारणांसाठी लवावे?''मजबूत केंद्रसत्तेमुळे राज्ये तयार झाली असे नाही. तर राज्यांमुळे मजबूत केंद्र तयार झाले,'' हे सत्य आणि संघराज्य व्यवस्थेचे महत्त्व थिल्लर अशा रोनाल्ड रेगन यांनाही उमगले होते. आपल्याकडे अद्यापही या सत्याची जाणीव तितकीशी दिसत नाही. राज्यांवर कुरघोडी करण्याने केंद्र मोठे होत नाही. उलट ते लहान दिसू लागते. लहानांवर मात करायची ईर्षा सतत बाळगणारे मोठे लहान होतात आणि मूळच्या लहानांना मोठेपणा गाजवण्याची संधी मिळते. ही सतत ' 'लहान'पण देगा देवा'ची इच्छा केंद्राने आता तरी सोडावी. त्यातच खरा मोठेपणा आहे.




# लोणी काळभोर, लोणीकंद पोलीस ठाणे पुणे शहर दलात समाविष्ट : अधिसूचना जारी

पुणे : वाढत्या नागरिकीकरणामुळे पुणे ग्रामीण पोलीस दलातील नागरीकरण झालेला भाग शहर पोलीस दलाकडे सोपविण्याची गेल्या काही वर्षांपासूनची मागणी राज्य शासनाने सोमवारी( (दि.२६) पूर्ण केली आहे. लोणी काळभोर आणि लोणीकंद पोलीस ठाणी आज शहर पोलीस दलात समाविष्ट करण्यात आले आहे. तशी अधिसूचना आज प्रसिद्ध करण्यात आली आहे.आवश्यक कर्मचारी व गुन्ह्यांचे आदान-प्रदान प्रक्रिया येत्या २ ते ४ दिवसात पूर्ण करुन १ नोव्हेंबरपासून ही पोलीस ठाणी शहर पोलीस दलात समाविष्ट होणार आहे. येथील पोलीस कर्मचाऱ्यांचे पगार व इतर खर्च पुणे शहर पोलीस दलातून होणार आहेत. लोणीकंद पोलीस ठाणे परिमंडळ ४ व सहायक पोलीस आयुक्त, येरवडा विभागाला आणि लोणीकाळभोर पोलीस ठाणे परिमंडळ ४ सहायक पोलीस आयुक्त, हडपसर विभागाला जोडण्यात आले आहे. त्यामुळे परिमंडळ ४ व ५ च्या अंतर्गत ७ पोलीस ठाणे व येरवडा व वानवडी सहायक आयुक्त कार्यालयाच्या अंतर्गत ४ पोलीस येणार आहेत.लोणी काळभोर , लोणीकंद पोलीस ठाण्यांबरोबरच हवेली पोलीस ठाणे शहर पोलीस दलात समाविष्ट करण्यात यावे, अशी गेल्या काही वर्षांपासूनची मागणी होती. गृह विभागात काम करणारे अमिताभ गुप्ता यांनी पुणे पोलीस आयुक्त म्हणून कार्यभार हाती घेतल्यानंतर यासंबंधीचे सर्व प्रस्ताव तपासले व त्याचा पाठपुरावा केला. त्यातूनच एका महिन्याच्या आत हे दोन्ही पोलीस ठाणे शहर पोलीस दलात समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.मात्र, याबरोबरच हवेली पोलीस ठाण्याचाही समावेश शहर पोलीस ठाण्यात करण्यात यावा, अशी मागणी होती. मात्र, त्याचा प्रस्ताव स्वतंत्रपणे पाठविला गेला असल्याने ती मागणी अद्याप पूर्ण होऊ शकलेली नाही. हवेली पोलीस ठाणे तसेच पुणे व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या सीमेरेषेवरील पोलीस ठाण्यांच्या सीमांची फेररचना करण्याची आवश्यकता आहे.राज्य शासनाने अभिसूचना काढली आहे त्यादृष्टीने पोलीस अधिकारी, कर्मचारी, कागदपत्रांची देवाणघेवाण अन्य बाबींची पुर्तता येत्या २ ते ४ दिवसात करण्यात येईल. १ नोव्हेंबरपासून संपूर्णपणे ही दोन्ही पोलीस ठाणी शहर पोलीस दलातून कार्यरत होतील.अमिताभ गुप्ता, पोलीस आयुक्त, पुणे शहर"

# स्वच्छताविषयक प्रोत्साहनासाठी स्वच्छ सोसायटी, हॉटेल, शाळा, हॉस्पिटल, मार्केट स्पर्धेचे आयोजन

स्वच्छ सर्वेक्षण 2020 मध्ये देशातील तृतीय क्रमांकाच्या स्वच्छ शहराचा बहुमान संपादन केलेल्या नवी मुंबई महानगरपालिकेने स्वच्छ सर्वेक्षण 2021 करीता देशात सर्वप्रथम क्रमांक मिळविण्याचा संकल्प केला असून महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनानुसार त्यादृष्टीने वाटचाल सुरू करण्यात आलेली आहे. स्वच्छताविषयक कार्यात नवी मुंबईकर नागरिकांचा चांगला सहभाग राहिल्याने नवी मुंबई महानगरपालिकेने आपले मानांकन नेहमीच उंचावत नेलेले आहे. त्या अनुषंगाने या लोकसहभाग वाढीवर भर देण्यात असून त्याकरीता विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.सध्या कोव्हीड 19 च्या काळात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता विविध उपाययोजना राबविल्या जात असून वारंवार हात धुणे, मास्कचा वापर करणे, सोशल डिस्टन्सींग राखणे अशा आरोग्य सुरक्षाविषयक नियमांचे पालन करण्यासाठी नागरिकांचे विविध माध्यमांतून प्रबोधन करण्यात येत आहे. त्याच बरोबरीने स्वच्छता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन स्वच्छतेविषयी देखील व्यापक स्वरूपात माहिती, शिक्षण, प्रसार व जनजागृती करण्यात येत आहे. रहिवाशांना कचरा वर्गीकरण व त्यावरील प्रक्रिया तसेच इतर स्वच्छता विषयक उपक्रम राबविण्यास प्रोत्साहित करणे तसेच या उपक्रमांमध्ये सातत्य ठेवून नागरिकांच्या स्वच्छताविषयक सवयींमध्ये बदल घडविण्याच्या दृष्टीने सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात येत आहेत.

स्वच्छताविषयक चांगले काम करणा-या व्यक्ती, संस्था यांना प्रोत्साहित करणे व त्यामधून इतरांसाठी प्रेरणा निर्माण करणे याकरीता नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'स्वच्छता स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. (1) स्वच्छ हॉटेल, (2) स्वच्छ शाळा (खाजगी व नमुंमपा), (3) स्वच्छ गृहनिर्माण संस्था / RWA,
(4) स्वच्छ मार्केट असोसिएशन, (5) स्वच्छ शासकीय कार्यालय आणि (6) स्वच्छ हॉस्पिटल अशा सहा प्रमुख गटांमध्ये स्वच्छता स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

या स्पर्धेमध्ये प्रामुख्याने कचरा वर्गीकरण (S o u r c e Segregation), कच-यावर कचरा निर्मितीच्या ठिकाणीच प्रक्रिया करणे, शौचालय व्यवस्था, स्वच्छता विषयक पायाभूत सुविधा आणि कोव्हीड-19 आजाराचा प्रसार रोखण्याकरीता करण्यात आलेल्या उपाययोजना व नियमांचे पालन असे विविध निकष गुणांकनाकरिता असणार आहेत.

या स्वच्छता स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणा-या संस्थांनी 26 ते 30 ऑक्टोबर 2020 या कालावधीत संबंधित विभाग कार्यालयात अर्ज दाखल करावयाचा आहे. या स्पर्धेचे प्रत्यक्ष स्थळ परीक्षण व गुणांकन दि. 02 ते 20 नोव्हेंबर, 2020 या कालावधीत करण्यात येणार आहे.

या स्वच्छता स्पर्धेच्या माध्यमातून नागरिकांना प्रोत्सहन मिळावे याकरीता विभाग स्तरावरून निवड करण्यात आलेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय स्वच्छ गृहनिर्माण संस्थांना अनुक्रमे रु.21 हजार, रु.15 हजार व रु.11 हजार अशी रोख बक्षिसे, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रासह वितरित केली जाणार आहेत. त्याचप्रमाणे महापालिका स्तरावरील विजेत्या प्रथम, द्वितीय व तृतीय स्वच्छ गृहनिर्माण संस्थांना अनुक्रमे रु.51 हजार, रु.41 हजार व रु.31 हजार रोख बक्षिसे सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र यांचेसह प्रदान केली जाणार आहेत.

स्वच्छ शाळा स्पर्धेच्या खाजगी व नमुंमपा दोन्ही गटांतील प्रथम व द्वितीय विजेत्या शाळांना अनुक्रमे रु.15 हजार व रु.11 हजार रोख बक्षिस तसेच स्वच्छ शाळा स्पर्धेच्या खाजगी व नमुंमपा दोन्ही गटांतील प्रथम व द्वितीय विजेत्या शाळांना अनुक्रमे रु.25 हजार व रु.21 हजार रोख बक्षिस हे सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रासह प्रदान करण्यात येणार आहे.

स्वच्छ मार्केट करीता प्रथम व द्वितीय क्रमांक विजेत्या मार्केटना अनुक्रमे रु.25 हजार व रु.21 हजार रोख बक्षिस, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रासह प्रदान करण्यात येणार आहे. स्वच्छ हॉटेल, स्वच्छ शासकीय कार्यालय, स्वच्छ हॉस्पिटल व स्वच्छ प्रभाग या विभागातील प्रथम व द्वितीय विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे. लोकसहभागातून नवी मुंबई शहरात स्वच्छतेची चळवळ उभी रहावी हा नवी मुंबई महानगरपालिकेचा प्रयत्न असून निकोप स्पर्धेतून नागरिकांना प्रेरणा मिळावी याकरिता आयोजित स्वच्छता स्पर्धेमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' व 'स्वच्छ नवी मुंबई मिशन' यशस्वीपणे राबविण्यात प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने आपला सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# ठाण्यात विजयादशमीनिमित्त पोलीस आयुक्तांनी केले शस्त्रपूजन



ठाणे : विजयादशमीनिमित्त ठाणे शहर पोलीस मुख्यालयातील आपल्या शस्त्रास्त्रांचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्या हस्ते पारंपारिक पद्धतीने पोलिसांनी पूजन केले. यावेळी फणसळकर यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना दस° यानिमित्त शुभेच्छा देऊन आपटयाच्या पानांचे वाटप केले.प्रथेप्रमाणे ठाणे पोलिसांनी यंदाही शस्त्रांस्त्रांचे विधीवत पूजन केले. पोलीस आयुक्त फणसळकर यांच्यासह अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय येनपुरे, ठाणे शहरचे पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे, मुख्यालयाचे उपायुक्त प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त नीता पाडवी आणि राखीव पोलीस निरीक्षक सुभाष माने आदी अधिका° यांनी हे पूजन केले. कोरोना संकट काळात आलेल्या यंदाच्या विजया दशमीला कोरोनापासून स्वत:चा व परिवाराचा बचाव करा, त्यासाठी योग्य ती काळजी घ्या. सामाजिक अंतराचे आणि स्वच्छतेचे नियम आवर्जून पाळा, असे आवाहन यावेळी पोलीस आयुक्तांनी केले.थेट पोलीस आयुक्तांनी आपल्याला अशा प्रकारे आस्थेने शुभेच्छा दिल्यामुळे पोलीस कर्मचारी भारावले होते.आयुक्तांनी शुभेच्छा दिल्यानंतर पोलीस बांधवांनीही आयुक्तांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. पोलीस कवायत मैदानामधील वाहनांचीही पूजा यावेळी करण्यात आली.* असे झाले शस्त्रपूजनठाणे शहर पोलीस मुख्यालयाच्या शस्त्रागारातील एसएलआर (सेल्फ लोडेड रायफल), कार्बाइन, नऊ एमएम पिस्टल, रिव्हॉल्व्हर आणि गॅसगन तसेच एकाचवेळी ३० काडतुसे सोडणारी एकेएम (अझाल्ट क्लासिनको माइल्ड) आणि एकावेळी ३० राऊंड फायर होणारी एलएमजी (लाईट मशिन गन) आदी शस्त्रांचे पोलीस आयुक्तांसह मुख्यालयातील कर्मचाऱ्यांनी पूजन केले.

# प्रतिबंधित पानमसाला असलेल्या गोदामावर अन्न व औषध प्रशासनाच्या दक्षता पथकाचा छापा





मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दि. १५.१०.२०२० रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास अन्न व औषध प्रशासनाच्या दक्षता विभागाने द फॅल्ग कंपनी शेजारील मोकळ्या जागेवरील गोडावून, लोढाधाम जवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे ता. वसई, जि. पालघर या गोदामावर छापा टाकून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या पान मसाला व सुगंधित तंबाखू या पदार्थांचा रु. २८,१९,७७२/- किंमतीचा साठा हजर व्यक्ती श्रवण वैधनाथ साहनी याच्या ताब्यातून जप्त केला. सदर साठा इक्बाल व राजू नामक व्यक्तीच्या मालकीचा असल्याचे समजले आहे. सदर प्रकरणी आरोपींविरुद्ध अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम व भारतीय दंडसंहिता अंतर्गत गुन्ह्यासाठी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला आहे.

सदर कारवाई अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. डॉ. राजेंद्र शिंगणे, राज्यमंत्री ना.
राजेंद्र येड्रावकर व मा. आयुक्त श्री. अरुण उन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सह आयुक्त (दक्षता) श्री. सुनील भारद्वाज यांच्या नियंत्रणाखाली अन्न सुरक्षा अधिकारी श्री. आर.डी.मुंडे, श्री. एम.आर.महांगडे, श्री. डी.एस.साळुंखे, श्री. डी.एस.महाले, श्री.बी.एन.चव्हाण, श्री. भांडवलकर, श्री. पी.पी.सूर्यवंशी यांनी यशस्वीरित्या पार पाडली. चार दिवसांपूर्वीच दक्षता पथकाने महापे येथे तीन वाहनावर छापा टाकून विमल पान मसाला व व्ही-१ सुगंधित तंबाखू या महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या पदार्थांचा रु. ३५,५३,३१२/- किंमतीचा साठा जप्त केला होता. प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या गोदामाबाबत अथवा वाहतुकीबाबत कोणतीही माहिती अथवा तक्रार असल्यास त्याची माहिती टोल प्रâ ी क्र. १८००२२२३६५ वर अन्न व औषध प्रशासनाला देण्याचे आवाहन सह आयुक्त (दक्षता) श्री. सुनील भारद्वाज यांनी जनतेला केले आहे.

# साडेतीनशे मुंबईकरांमागे एक पोलीस; मंजूर पदांपैकी 19 ते 20 टक्के अद्यापही रिक्त

मुंबई - कायम अतिरेक्यांच्या टार्गेटवर असलेल्या मायानगरी मुंबईच्या सुरक्षेची जबाबदारी तुटपुंज्या मुंबई पोलिसांच्या मनुष्यबळाच्या खांद्यावर आहे. साडेतीनशे मुंबईकरांमागे एक पोलीस असे सध्याचे चित्र आहे. मंजूर पदांपैकी १९ ते २० टक्के अद्यापही रिक्त आहेत. यात सहायक पोलीस निरीक्षकांच्या पदांमध्ये सर्वाधिक ४१ टक्के तफावत आहे.देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईची लोकसंख्या सुमारे सव्वाकोटी आहे. मुंबईकरांच्या सेवेसाठी मात्र अवघा ४० हजार पोलिसांचा फौजफाटा कार्यरत आहे. एका खासगी संस्थेच्या अहवालानुसार, २०१८ मध्ये मुंबई पोलीस दलात ५० हजार ६०६ पदे मंजूर होती. त्यापैकी ३९ हजार ५६१ जण कार्यरत होते. म्हणजे यात २२ टक्क्यांची तफावत आहे. याच प्रकारे २०१९ मध्ये मुंबईत मंजूर ५० हजार ४८८ पदांपैकी ४१ हजार ११५ जणांचा फौजफाटा कार्यरत आहे. कार्यरत पोलिसांपैकी बंदोबस्तासाठी सर्वाधिक मनुष्यबळ अडकून असते.टेक्निकल पोस्टकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. ५ हजार पदे मंजूर असताना अवघ्या २ हजार ८४४ मनुष्यबळावर काम सुरू आहे. याचा फटका गुन्ह्यांचा तपासावर होत आहे.पोलिसांवरील कामाचा अतिरिक्त भार वाढतच आहे. त्यामुळे निदान राज्यभरासाठी होणाऱ्या मेगा



पोलीस भरतीतून तरी किमान ही तफावत कमी होईल, अशी आशा पोलिसांना आहे.अशी आहेत रिक्त पदे16%पोलीसनिरीक्षक41%सहायकपोलीस निरीक्षक28%पोलीस उपनिरीक्षक29%सहायक पोलीस उपनिरीक्षककोरोना संकट; जीव गमाविण्याची वेळकोरोनाच्या काळात सर्वाधिक फटका पोलिसांना बसताना दिसत आहे. लॉकडाऊनमध्ये बंदोबस्तावरील राज्यभरातील २० हजार पोलिसांना कोरोनाची बाधा झाली. त्यापैकी २०८ पोलिसांना कोरोनामुळे जीव गमवावा लागला आहे. यात मुंबईतील साडेतीन हजार पोलिसांचा समावेश आहे, तर ६०हून अधिक पोलिसांवर कोरोनामुळे जीव गमाविण्याची वेळ ओढावली आहे.

# 'वेतन रोखत शिक्षकांना विनाकारण शाळेत बोलवू नका'



मुंबई : शिक्षकांना विनाकारण शाळेत बोलावू नये, शिक्षक / कर्मचारी यांचे ऑनलाईन कर्तव्यकाळ गृहीत धरून कोणत्याही कर्मचाऱ्याचे वेतन रोखू नये शिवाय शासनाचे पुढील आदेश येईपर्यंत परीक्षा आयोजनाची घाई करू नये असे स्पष्ट आदेश मुंबई विभागाच्या शिक्षण उपसंचालकांनी दिले आहेत. क्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी याबाबत शिक्षण उपसंचालक यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करून याबाबत मागणी लावून धरली होती.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर 24 जून 2020 च्या शासन निर्णयानुसार शिक्षकांना वर्क फ्रॉम होमची सवलत दिलेली आहे. कोरोना व्हायरसचं संकट असताना या काळात शाळा बंद असल्यातरी शिक्षक ऑनलाईन शिक्षण वर्ग घेत आहेत. तरीसुद्धा अनेक शाळा त्यांना आठवड्यातून एकदा-दोनदा शाळेत केवळ सहीसाठी बोलावत आहेत.

शिक्षक हजर न राहिल्यास त्यांची पगार कपातही केली जात आहे. अनेक कर्मचारी ठाणे, नवी मुंबई, रायगड आणि पालघर जिल्ह्यात राहत असल्याने, तसंच लोकल ट्रेन बंद असल्यामुळं खासगी वाहनं करून शाळेत येत आहेत. शाळेच्या हट्टापायी शिक्षकांना तीन ते चार हजार रुपये खर्च करून शाळेत यावे लागत आहे. यामुळं अनेक शिक्षकांना कोरोनाचा संसर्गही झाला आहे. तर मुंबईसह राज्यात काही शिक्षकांचा मृत्यूदेखील झाला आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता हा महत्त्वाचा आदेश काढण्यात आला आहे. शिवाय प्रथम चाचणी आणि सहामाही परीक्षा आयोजनाबाबत शिक्षण विभागाने कोणतेही आदेश दिलेले नाहीत. तरीही काही शाळांनी परीक्षा आयोजनाबाबत सुचना केल्या आहेत. शिक्षकांच्या या तक्रारींबाबत शिक्षक भारतीने शिक्षण उपसंचालक यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. प्रत्यक्ष बैठकीतही सदर वस्तुस्थिती मांडली होती. बैठकीला आमदार कपिल पाटील यांच्यासोबत शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे, प्रमुख कार्यवाह जालिंदर सरोदे, ज्युनिअर कॉलेज मुंबई युनिट अध्यक्ष शरद गिरमकर, कार्याध्यक्ष ईश्वर आव्हाड, पालघर जिल्हाध्यक्ष अनिल शेलारही उपस्थित होते.

# जीएसटी फसल्याची चूक मान्य करुन रद्द करा - उद्धव ठाकरे

मुंबई : 'जीएसटी पद्धत फसली आहे. पंतप्रधानांनी चूक मान्य करून जीएसटी रद्द करून जुन्या करप्रणालीकडं जायला हवं', असं म्हणत राज्याचे मुख्यमंत्री शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी पंतप्रधानांवर टीका केली आहे. तसेच सर्व राज्यातील मुख्यमंत्र्यांना आवाहन आहे पुढे या, आपण यावर चर्चा करु, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी केले. कोणाच्या पैशातून बिहारला फुकट लस देत आहात? असा प्रश्नही उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला. कर गोळा करण्याचा जो अधिकार आमच्याकडे होता. त्यावेळीही शिवसेना जीएसटीला विरोध करत होती. इथला पैसा दिल्लीत जाणार, मग दिल्ली सगळीकडे वाटणार. पैसा येत नाहीये. जीएसटी जर तुम्ही आम्हाला देऊ शकत नसाल, तर सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना मी या व्यासपीठावरून आवाहन करतोय की, पुढे या यावर चर्चा करूया. जीएसटीची जी काही कर पद्धत आहे, ती जर फसली असेल आणि मला वाटतं ती फसली आहे. आमच्या हक्काचा पैसा आम्हाला मिळाला पाहिजे. तो मिळत नाहीये. पत्रावर पत्र दिली जात आहेत. त्या पत्राला केराची टोपली दाखवली जाते. ते जर पैसे मिळत नसतील. ही जीएसटीची पद्धत जर फसलेली असेल, तर मला वाटतं पंतप्रधानांनी सुद्धा प्रामाणिकपणे चूक मान्य करून त्यात सुधारणा केली पाहिजे, नाही तर पुन्हा जुन्या करप्रणालीवर जाण्याची गरज असेल, तर तसं






त्यांनी केलं पाहिजे," अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. शिवसेनेचा यंदाचा दसरा मेळावा साधेपणाने साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहाच्या हॉलमध्ये दसरा मेळावा साजरा होणार आहे. १९६६ साली शिवसेनेचा दसरा मेळावा पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केला. शिवाजी पार्कवर हा दसरा मेळावा गेल्या पाच दशकांपासून साजरा होत आहे. ३० ऑक्टोबर १९६६ साली शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा शिवाजी पार्कवर पार पडला. तेव्हापासून या दसरा मेळाव्याची परंपरा आहे.

# कुबेर फायनान्स कंपनीकडून 27 लाखांना गंडा


जादा दराने व्याजाचे आमिष दाखवत गुंतवणूक करायला भाग पडणाऱ्या कुबेर फायनान्स सोल्युशन्स (केएफएस) कंपनीने एका व्यक्तीला तब्बल 27 लाख रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सोपान कोंडाजी गवळी (रा. नारायणटेंभी, ता. निफाड) यांनी कुबेर फायनान्सचे मालक सोमनाथ नेहे यांच्या विरोधात विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. प्रताप दिघावकर यांच्याकडे तक्रार केली आहे.



एका वर्षात तब्बल तीनपट पैसे परत करतो, असे आमीष दाखवून सोमनाथ नेहे यांनी सोपान गवळी यांना आपल्या कंपनीत 9 लाख रुपयांची गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार गवळी यांनी 2014 मध्ये ही गुंतवणूक केली. ठरल्याप्रमाणे नेहे यांनी सोपान गवळी यांना 27 लाख रुपयांचे धनादेशही दिले. त्यातील सहा लाख रुपयांचा धनादेश वटवण्यासाठी दिला असता तो बाऊन्स झाला. त्यामुळे उर्वरित धनादेश जमा न करता सोपान गवळी यांनी नेहे यांना फोन करण्यास सुरुवात केली. त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत चालढकल केली. अनेकदा फोन केला तरी उत्तर मिळत नव्हते. कालांतराने नेहे यांचा फोन बंद झाला. हा सर्व प्रकार बाळासाहेब शिरसाठ (कोटमगाव, ता.निफाड) व शिवाजी शिंदे (खडक माळेगाव, ता. निफाड) यांच्या समक्ष घडल्याचे तक्रार अर्जात म्हटले आहे. या प्रकरणी कारवाई करुन न्याय मिळवून देण्याची मागणी सोपान गवळी यांनी केली आहे.

# दादरच्या जाखादेवीजवळील रुग्णालयाच्या कामाला लवकरच सुरुवात

श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाकडून ताब्यात घेतलेल्या दादरच्या जाखादेवी दवाखान्याची जागा पुन्हा महापालिकेने न्यासालाच देत त्यावर महापालिकेच्यावतीने उभारण्यात येणारी रुग्णालयाची वास्तू न्यासालाच चालवण्यास देण्याचा करार ऑगस्ट २०१९ केला. त्यानुसार याठिकाणी महापालिकेच्यावतीने मल्टीस्पेशालिटी चिकित्सालय उभारले जात आहे. या चिकित्सालयावर ३७ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. महापालिकेच्या इतिसाहात बांधकाम होण्याआधीच ती वास्तू एखाद्या संस्थेला देण्याचा करार झाला आहे. दादर गोखले रोडवरील जाखादेवी मंदिर चौकाशेजारी असलेल्या दवाखान्याच्या जागेवर महापालिकेच्यावतीने तळघर अधिक तळमजला अशा ९ मजली इमारत बांधण्यात येणार आहे. एकूण ३२६२ चौरस मीटरचे बांधकाम करण्यात येणार आहे. या इमारतीमधील तळ अधिक तीन




मजल्यापर्यंतचा वापर महापालिकेचा दवाखाना तसेच आरोग्य केंद्र यासाठी केला जाणार आहे. उर्वरित सर्व मजले श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाला देण्यात येणार आहेत. यामध्ये माता व बाल रुग्णांसह मल्टीस्पेशालिटी उपचारांकरता बाह्यरुग्ण आरोग्य सेवा सुविधा पुरवल्या जाणार आहेत. त्यामुळे प्रसुतीगृह व दवाखाना यासाठी आरक्षित असलेला हा भूखंड श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाला भाडेतत्वावर देण्याबाबतचा सामंजस्य करार ऑगस्ट २०१९ मध्ये महापालिका सभागृह नेत्या विशाखा राऊत यांच्या दालनात झाला. पुढील ३० वर्षांकरता या भूखंडावर उभारण्यात येणारी चिकित्सालयाची इमारत भाडेकरारावर देण्यात आली आहे. या करारावर न्यासाचे अध्यक्ष आदेश बांदेकर, न्यासाचे सीईओ प्रियंका कुलकर्णी-छापवाले, तत्कालिन उपायुक्त (आरोग्य) सुनील धामणे, सभागृहनेत्या विशाखा राऊत तसेच स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी स्वाक्षरी केल्या होत्या. जाखादेवी मंदिराजवळ उभारण्यात येणाऱ्या या मल्टीस्पेशालिटी चिकित्सालयाच्या एकूण ४ हजार १४८ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जागेवर बांधकाम केले जाणार आहे. यासाठी किंजल सिव्हीलकॉन एल.एल.पी कंपनीची निवड करण्यात आली आहे. या कंपनीला विविध करांसह ३७ कोटी २७ लाख रुपयांना कंत्राट दिले जाणार आहे. न्यासासाठी काहीपण… तब्बल २० वर्षांपूर्वी गोखले रोडवरील जाखादेवी येथील महापालिका दवाखान्याची जागा न्यासाला भाडेतत्वावर देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु भाडेकरार केल्यानंतरही न्यासाने त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे बांधकाम केले नाही. त्यामुळे तत्कालिन अतिरिक्त आयुक्त मनिषा म्हैसकर यांनी न्यासाकडून ही जागा ताब्यात घेऊन त्यावर रुणालय उभारण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे न्यासाकडून परत घेतलेली जागा आता पुन्हा एकदा न्यासाच्याच ताब्यात सोपवण्याचा प्रताप प्रशासनाने केला आहे. महापालिकेच्या नियमानुसार मोकळ्या भूखंडावर बांधकाम करून त्याठिकाणी सेवा सुविधा देण्यासाठी खासगी सहभाग तत्वावर खासगी संस्थेची नेमणूक केली जाते. तर जी समाजकल्याण केंद्रे आहेत, ती खासगी संस्थेला चालवायला दिली जातात. परंतु न्यासासाठी महापालिकेचा उलटा फेरा घातला आहे. आधी भूखंडावरील बांधण्यात येणारी रुग्णालयीन इमारत भाडेकरार संस्थेला नाममात्र दरात उपलब्ध करून देण्याचा करार आधीच केला आहे.

# कोरोनामुळे आरटीई प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना संधी

शिक्षण हक्क कायद्यांर्गत (आरटीई) राबवण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या प्रतीक्षा यादीतील प्रवेशाला मुदतवाढ देऊनही पालकांकडून पाठ फिरवण्यात येत आहे. आतापर्यंत मुंबईतून प्रतीक्षा यादीतील ३५६ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला आहे. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुख्य यादीतील प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाकडून प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. दुसऱ्या प्रवेश यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशापूर्वी हे प्रवेश देण्याचे आदेश शिक्षण विभागाकडून काढण्यात आले आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार दरवर्षीप्रमाणे २५ टक्के प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात ऑनलाईन पद्धतीने राबवण्यात येते. त्यानुसार १७ मार्च २०२० रोजी सोडत काढण्यात आली होती. जे विद्यार्थी सोडतीमध्ये विजयी ठरले होते त्यांना १५ सप्टेंबरपर्यंत शाळेत जाऊन प्रवेश निश्चित करायचा होता. परंतु काही जिल्ह्यांमध्ये कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे सोडतीमध्ये राज्यभरातून निवड झालेल्या १ लाख ९२६ विद्यार्थ्यांपैकी ६८ हजार २८७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले होते. मुंबईतून ५३७१ विद्यार्थ्यांपैकी ३१३८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले होते. यामध्ये मुंबईतून प्रतीक्षा यादीतील ३५६ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला आहे. यातील २७२ प्रवेश हे




मुंबई शिक्षण उपसंचालक कार्यालयाची मान्यता असलेल्या शाळांमध्ये तर ८४ विद्यार्थ्यांनी महापालिकेची मान्यता असलेल्या शाळांमध्ये प्रवेश घेतले आहेत. कोरोनाची परिस्थिती सुधारत असल्याने आता काही विद्यार्थ्यांचे पालक प्रवेशासाठी संपर्क साधत आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या विद्यार्थ्यांना दुसऱ्या प्रवेश यादीतील विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरू होण्यापूर्वी शाळांमध्ये रिक्त असलेल्या जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या सूचना शिक्षण विभागाकडून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. दुसऱ्या प्रवेश यादीतील विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरू झाल्यानंतर मुख्य यादीतील विद्यार्थ्यांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, अशी माहिती प्राथमिक शिक्षण संचालक द.गो.जगताप यांनी परिपत्रकाद्वारे दिली. शाळांमध्ये शिल्लक राहिलेल्या रिक्त जागांनुसार पालकांना मेसेजद्वारे प्रवेशाचा दिनांक कळवण्यात येत आहे. परंतु पालकांनी फक्त मेसेजवर अवलंबून न राहता आरटीई पोर्टलवर प्रवेशाची तारीख या ठिकाणी आपला अर्ज क्रमांक प्रवेश घेण्याचा दिनांक पाहावा, अशा सूचनाही शिक्षण विभागाकडून दिल्या आहेत. तसेच शाळेत प्रवेश घेण्यासाठी बालकांना सोबत घेऊन जाऊ नये असेही आवाहन करण्यात आले आहे

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898